“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2024-25

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२४ जून २०२४/५

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या महाविद्यालयामध्ये २१ जून 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या एनसीसी व क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात योगा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी योगासने केली. प्राचार्य डॉ. मणेर यांनी मनोगतामध्ये योगाचे महत्त्व, बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्य व स्वास्थ्य यासाठी योग व प्राणायाम यावर भाष्य करत सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी एनसीसी प्रमुख प्रा. विनायक भोई, क्रीडा संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले यांच्यासह गुरुदेव कार्यकर्ते, प्रशासकीय सेवक, एनसीसी कॅडेट उपस्थित होते. प्रा. विनायक भोई यांनी सर्वांचे आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ , सोमवार, ८ जुलै २०२४



इचलकरंजी :डीकेएएससी महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनीच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य एस. एम. मणेर यांनी मार्गदर्शन केले.

## 'डीकेएएससी'मध्ये प्राध्यापक प्रबोधिनी

इचलकरंजी : 'अठरापगड जातीच्या मुलांची वसतिगृहे, राधानगरी धरण, शाहू मिल ही शाहू महाराजांच्या कर्तृत्वाची स्मारके आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणून सन्मानाचे जगणे त्यांच्या वाट्याला यावे यासाठी शाहूंनी केलेले कार्य आभाळा एवढे मोठे आहे,' असे प्रतिपादन प्राचार्य. एस. एम. मणेर यांनी केले. डीकेएएससी महाविद्यालयात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष व प्राध्यापक प्रबोधिनीच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉ. डी. सी. कांबळे उपस्थित होते. प्रा. संजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहित शिंगे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

लोकमत

# दत्ताजीराव कदम एएससी कॉलेजचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत समावेश झाला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते करण्यात आला.

प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, एका शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. याच प्रेरणेतून इथून पुढेही महाविद्यालयाचे विद्यार्थी ही परंपरा कायम ठेवतील आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिप्रेत ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारांनी समृद्ध विद्यार्थी घडतील. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी महाविद्यालयाकडून नेहमीच सदिच्छा असतील. या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत कोमल बेळेकुंद्री, स्वाती देशनुरे , कृष्णकुमार हुरकत, राखी हुरकट, स्मोर्णिका मोहंती, सोनाली मोहंती, ओंकार बेलेकर, आरती सर्वा, स्नेहा गायकवाड, प्रसाद जाधव, आकांक्षा कोपार्डे, करिना मुजावर या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. घारे, प्रा. ए. एस. कटकोळे, प्रा. चेतन पाटील, आदी उपस्थित होते.



इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

Hello Kolhapur Gramin
Page No. 3 Jul 21, 2024
Powered by: erelego.com

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, २२ जुलै २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## 'डीकेएएससी'मध्ये गुणवंतांचा सत्कार

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत यश संपादन केले. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीतील महाविद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांचा सन्मान प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते केला. शिष्यवृत्ती यादीत कोमल बेळेकुंद्री (बी.सी.ए.), स्वाती देशनुरे (बी.सी.ए.), कृष्णकुमार हुरकत (बी.सी.ए), राखी हुरकट (बी.सी.ए.), स्मोर्णिका मोहंती (बी.सी.ए.), सोनाली मोहंती (बी.सी.ए.), ओंकार बेलेकर (इतिहास), आरती सर्वा (हिंदी), स्नेहा गायकवाड (केमिस्ट्री), प्रसाद जाधव (केमिस्ट्री), आकांक्षा कोपार्डे (इलेक्ट्रॉनिक्स), करिना मुजावर (केमिस्ट्री) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. घारे, प्रा. ए. एस. कटकोळे, प्रा. चेतन पाटील आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

२२ जुलै २०२४/७



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत यश संपादन केलेले विद्यार्थी सोबत शिक्षक.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये डी.के.ए.एस.सीचे १२ विद्यार्थी

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, इचलकरंजी या महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत यश संपादन केले आहे. या यशवंत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. मणेर यांनी एका शैक्षणिक वर्षात १२ विद्यार्थ्यांना विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. याच प्रेरणेतून इथून पुढेही महाविद्यालयाचे विद्यार्थी ही परंपरा कायम ठेवतील आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिप्रेत ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कांनी समृद्ध विद्यार्थी घडतील.

या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत कोमल ऐळेकुंद्री (बी.सी.ए), स्वाती देशनुरे (बी.सी.ए), कृष्णकुमार हुरकत (बी.सी.ए), राखी हुरकट (बी.सी.ए), स्मोर्णिका मोहंती (बी.सी.ए), सोनाली मोहंती (बी.सी.ए), ओंकार बेलेकर (इतिहास), आरती सर्वा (हिंदी), स्नेहा गायकवाड (केमिस्ट्री), प्रसाद जाधव (केमिस्ट्री), आकांक्षा कोपार्डे (इलेक्ट्रॉनिक्स), करीना मुजावर (केमिस्ट्री) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. घारे, प्रा. ए. एस. कटकोळे, प्रा. चेतन पाटील आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
बुधवार, २४ जुलै २०२४

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाची भरारी

## १२ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती पटकावली

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, इचलकरंजी या महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत यश संपादन केले. विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची यादी नुकतीच जाहीर केली. यामध्ये महाविद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते महाविद्यालयात करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, एका शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांना विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. याच प्रेरणेतून इथून पुढेही महाविद्यालयाचे विद्यार्थी ही परंपरा कायम ठेवतील. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिप्रेत ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारांनी समृद्ध विद्यार्थी घडतील.



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ शिष्यवृत्ती स्पर्धेमध्ये गुणवत्ता यादीत आलेले डीकेएएससी कॉलेजचे विद्यार्थी समवेत मार्गदर्शक शिक्षक.

गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत कोमल बेळेकुंद्री (बी.सी.ए), स्वाती देशनुरे (बी.सी.ए), कृष्णकुमार हुरकत (बी.सी.ए), राखी हुरकट (बी.सी.ए), स्मोर्णिका मोहंती (बी.सी.ए), सोनाली मोहंती (बी.सी.ए), ओंकार बेलेकर (इतिहास), आरती सर्वा (हिंदी), स्नेहा गायकवाड (केमिस्ट्री), प्रसाद जाधव (केमिस्ट्री), आकांक्षा कोपार्डे (इलेक्ट्रॉनिक्स), करीना मुजावर (केमिस्ट्री) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्वच विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. घारे, प्रा. ए. एस. कटकोळे, प्रा. चेतन पाटील आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४

# मुंशी प्रेमचंद यांच्या साहित्यात जगण्याची संजीवनी : डॉ. मणेर

## डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

इचलकरंजी, ता. १ : मुंशी प्रेमचंद यांचे साहित्य आजही प्रत्येक टप्प्यावरती जीवन जगण्याची संजीवनी आहे. जगण्याच्या विविध विषयांवरील ३०० हून अधिक हिंदी कथा आणि पंधराहून अधिक कादंबऱ्या लिहिणारे प्रेमचंद हे हिंदी साहित्याला लाभलेले अनमोल रत्न होते. स्वातंत्र्यपूर्वकालीन साहित्यिक कारकीर्द असणारे प्रेमचंद यांचे साहित्य आजही महत्त्वाचे ठरते. यावरून त्यांची प्रतिभेची महानता लक्षात येते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी काढले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने 'मुंशी प्रेमचंद' जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. मणेर यांचे 'उपन्यास सम्राट मुंशी प्रेमचंद' या



डॉ. मणेर

विषयावरील व्याख्यान झाले. पुढे त्यांनी हिंदी भाषेतील स्वरचित कविता, गझल ऐकवून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षस्थानी सत्र प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे होते. प्रा. गावित यांसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. सफिया मुल्ला यांनी केले. पाहुण्यांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ.अंजली उबाळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. किशोरी टोणपे यांनी तर आभार प्रा. अपर्णा कांबळे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार २ ऑगस्ट २०२४

# मुंशी प्रेमचंद यांचे साहित्य आजही प्रेरणादायी

## डीकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मणेर यांचे गौरवोद्‌गार

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

मुंशी प्रेमचंद यांचे साहित्य आजही आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रेरणादायी ठरते आहे. त्याचप्रमाणे ते जीवन जगण्याची संजीवनी आहे. जगण्याच्या विविध विषयावरील ३०० हून अधिक हिंदी कथा आणि पंधराहून अधिक कादंबऱ्या लिहिणारे प्रेमचंद हे हिंदी साहित्याला लाभलेले अनमोल रत्न होते. स्वातंत्र्यपूर्वकालीन साहित्यिक कारकीर्द असणारे प्रेमचंद यांचे साहित्य आजही महत्वाचे ठरते यावरून त्यांची प्रतिभेची महानता लक्षात येते, असे गौरवोद्‌गार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी काढले.




इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये व्याख्यानात बोलताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, व्यासपीठावर मान्यवर.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील हिंदी विभागाच्यावतीने मुंशी प्रेमचंद जयंतीनिमित्त 'उपन्यास सम्राट मुंशी प्रेमचंद' यावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. मणेर यांनी हिंदी भाषेतील स्वरचित कविता, गझल ऐकवून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षस्थानी डॉ. डी. सी. कांबळे होते. प्रास्ताविक प्रा. सफिया मुल्ला यांनी केले. पाहुण्यांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ. अंजली उबाळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. आभार प्रा. अपर्णा कांबळे यांनी मानले. यावेळी प्रा. गावित, प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत | शनिवार, १० ऑगस्ट २०२४

# सेट परीक्षेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाचा डंका

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्‌स, सायन्स अँड कॉमर्स, इचलकरंजी महाविद्यालयातील ७ प्राध्यापक व १ विद्यार्थी असे एकूण ८ परीक्षार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. प्राध्यापकांचा सन्मान प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य प्राध्यापक पात्रता परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये विजय रमेश सुर्यवंशी, रोहित चंद्रकांत सदलगे (संख्याशास्त्र), निलेश हरी वाघमारे, सौरम राजेंद्र मोरे (रसायनशास्त्र), स्विटी बाळासो फडतरे (रसायनशास्त्र), परेश बाळासाहेब मट्टीकल्ली (इलेक्ट्रॉनिक्स), अपूर्वा संजय कांबळे (गणित) हे गुरुदेव कार्यकर्ते आणि अमित कोवे (समाजशास्त्र) हा विद्यार्थी असे एकूण ८ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले. यावेळी प्राचार्य डॉ. मणेर यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. ए. ए. घारे, प्रा. डी. जे. मुंगारे प्रा. चेतन पाटील आदी प्राध्यापक उपस्थित होते.



CS Scanned with CamScanner

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजची महाराष्ट्र बटालियनमार्फत राजाराम मैदानावर एनसीसी भरती प्रक्रिया झाली.

# डीकेएएससी महाविद्यालयातर्फे इचलकरंजीत एनसीसी छात्रभरती

## १८ जागांसाठी १८० हून अधिक सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २६ : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या वतीने ५६ महाराष्ट्र बटालियन, कोल्हापूर यांच्यामार्फत राजाराम स्टेडियम मैदानावर नवीन एनसीसी छात्र भरती प्रक्रिया झाली. एकूण १८ जागांसाठी महाविद्यालयातील १८० हून अधिक इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.

भरती प्रक्रियेत शारीरिक चाचणीत रनिंग, सीटअप्स, पुलअप्स, पुशअप्स तसेच लेखी परीक्षा आणि मुलाखत झाली. याबाबत बटालियनकडून अंतिम कार्यवाही करून भरती प्रक्रियेचा निकाल जाहीर होणार आहे. ५६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल पुनीत गोगिया, अॅडम ऑफिसर लेफ्टनंट कर्नल निखिल सक्सेना, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयात ५६ महाराष्ट्र बटालियनअंतर्गत एनसीसी विभाग गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. यातून २७० हून अधिक एनसीसी छात्र आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, पोलिस अधिकारी व प्रशासनात कार्यरत आहेत. यासाठी दरवर्षी एनसीसी युनिटसाठी भरती प्रक्रिया घेतली जाते.

यावर्षीही विद्यार्थ्यांनी भरती प्रक्रियेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. भरती प्रक्रियेचे नियोजन प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. विनायक भोई, प्रभारी एनसीसी विभागप्रमुख प्रा. रोहित शिंगे यांनी केले.

संपूर्ण भरती प्रक्रिया ५६ महाराष्ट्र बटालियनचे सुभेदार मेजर रवींद्र चव्हाण, सुभेदार लेफ्टनंट सुरेश अडसूळ, सुभेदार कन्हैया, सुभेदार राठोड, हवालदार एन. एस. विभूते, हवालदार संदीप गायकवाड, हवालदार रशविंदर सिंग यांच्या नियंत्रणाखाली झाली.

Kolhapur, Kopjillha
27/08/2024 Page No. 8

तरुण भारत | मंगळवार २७ ऑगस्ट २०२४



इचलकरंजी : राजाराम स्टेडियम येथे डीकेएएससीतर्फे ५६ महाराष्ट्र एनसीसी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली.

# डीकेएएससीमध्ये ५६ महाराष्ट्र बटालियनतर्फे एनसीसी प्रवेश प्रक्रिया

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये ५६ महाराष्ट्र बटालियन, कोल्हापूर यांच्यामार्फत राजाराम स्टेडियम येथे महाविद्यालयाची नवीन एनसीसी कॅडेट प्रवेश प्रक्रिया ५६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल पुनीत गोगिया, ऑफिसर लेफ्टनंट कर्नल निखिल सक्सेना, प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

डीकेएएससी महाविद्यालयामध्ये ५६ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत एनसीसी विभाग अनेक वर्षांपासून यशस्वीरित्या कार्यरत आहे. एनसीसी बटालियनचे विविध कॅम्प व आरडीसी परेड मधील यशस्वी सहभागाच्या माध्यमातून महाविद्यालयाचा एनसीसी विभाग नेहमीच यशस्वी वाटचाल करत राहिला आहे. महाविद्यालयाचे शेकडो एनसीसी कॅडेट आज आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, पोलीस अधिकारी व प्रशासनात कार्यरत आहेत. १८ जागांसाठी पार पडलेल्या या प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयातील १५० हून अधिक इच्छुक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शारीरिक चाचणी (रनिंग, सीटअप्स, पुलअप्स, पुशअप्स), लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यांमधून ही प्रवेश प्रक्रिया पार पडली. लवकरच बटालियनकडून या प्रवेश प्रक्रियेचा निकाल जाहीर होईल.

प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांनी ऑफिसर लेफ्टनंट कर्नल निखिल सक्सेना, एनसीसी अधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी ५६ महाराष्ट्र बटालियनचे सुभेदार मेजर रवींद्र चव्हाण, सुभेदार लेफ्टनंट सुरेश अडसूळ, सुभेदार कन्हैया, सुभेदार राठोड, हवालदार एन. एस. विभुते, हवालदार संदीप गायकवाड, हवालदार रावींदर सिंग उपस्थित होते. प्रा. मेजर मोहन वीरकर यांची या प्रवेश प्रक्रियेसाठी विशेष उपस्थिती होती. नियोजन प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. विनायक भोई, प्रभारी एनसीसी विभाग प्रमुख प्रा. रोहित शिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी कॅडेट्सनी केले होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२८ ऑगस्ट २०२४/६



कदम महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व ६० व्या 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचा प्रकाशन करताना प्रसाद कुलकर्णी व इतर.

# सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचे प्रतिबिंब साहित्यामध्ये दिसून येते

## – प्रसाद कुलकर्णी

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** साहित्यामध्ये मानवी भावभावनांचा आणि समकालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचे प्रतिबिंब दिसून येते असे मत गझलकार प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी येथे महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व महाविद्यालयाच्या ६० व्या विवेक वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन असा संयुक्त समारंभ समाजवादी प्रबोधिनीचे प्रमुख, विचारवंत, गझलकार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. एस. एम.मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

आपल्या मनोगतामध्ये बोलताना प्रमुख पाहुणे साहित्यिक प्रसाद कुलकर्णी म्हणाले, उच्च प्रतीच्या साहित्यामध्ये आशयघनते बरोबरच नादमाधुर्य असल्याने साहित्य हे समाज परिवर्तनास दिशा देण्याचे काम करते. महाविद्यालयाचे नियतकालिक हे विद्यार्थ्यांमधील साहित्यिक कलागुणांना वाव देते. यातूनच चांगले साहित्य घडतात.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. मणेर यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपायला हवी. चांगले व सकस वाचन करून त्यावर चिंतनातून चांगले लेखन सुद्धा विद्यार्थ्यांनी करायला हवे. वाङ्मय मंडळाचे उपक्रम आपल्याला साहित्याची गोडी लावतात. सर्व भाषेतील साहित्य विद्यार्थी दशेत आपल्याला समृद्ध करत असते.

दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि संस्थाप्रार्थनेने सुरू झालेल्या समारंभासाठी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी ए. यादव, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ, मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष जाधव यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक वाङ्मय मंडळाच्या सचिव डॉ. प्रभा पाटील यांनी तर परिचय व आभार प्रदर्शन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा.संदीप हारगाणे, प्रा. अंकुश कुरणे यांच्यासह वाङ्मय मंडळातील सदस्यांनी केले. यावेळी ग्रंथपाल प्रा. विजय यादव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, २ सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचा प्रकाशन समारंभ झाला.

# 'डीकेएएससी'मध्ये संयुक्त कार्यक्रम

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन असा संयुक्त समारंभ झाला. समाजवादी प्रबोधिनीचे प्रमुख प्रसाद कुलकर्णी यांच्याहस्ते व प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ, मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष जाधव यांची उपस्थित होती.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार २ सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये व्यवसाय आणि व्यवसायाचे नमुने' भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, मान्यवर.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी

इचलकरंजी

येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये कॉमर्स विभागांतर्गत 'व्यवसाय आणि व्यवसायाचे नमुने'या विषयावरील भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेमध्ये एकूण १०७ विद्यार्थी २४ गट करून सहभागी झाले. हा विषय भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून उत्तमरित्या मांडला. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून अनेक उपलब्ध असलेल्या व्यवसाय क्षेत्रातील विविध संधी आणि नावाजलेल्या उद्योग संस्था तसेच उद्योजक या विषयावर केलेल्या विविध भित्तीपत्रिकेच्या माहितीचा वापर करावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

कॉमर्स विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील यांनी स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. पूजा पारिशवाड आणि विद्यार्थिनी अमृता मांगलेकर यांनी प्रस्तावना केली. विद्यार्थिनी गायत्री मोरे हिने आभार मानले. माहिरा मुजावर हिने सूत्रसंचालन केले.

सकाळ सत्राचे प्र. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, इंग्रजी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. वेल्हाळ, मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जाधव, कॉमर्स विभागाचे प्रा. डॉ. आर. एस. रोड्रीक्स, प्रा. कल्पना जाधव, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. कोमल कोळी, प्रा. अर्चना नंदगावे, प्रा. रोहित शिंगे, विद्यार्थी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी

२ सप्टेंबर २०२४/१

# व्यवसाय व व्यवसायाचे नमुने भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजीमध्ये कॉमर्स विभागांतर्गत 'व्यवसाय आणि व्यवसायाचे नमुने' या विषयावरील भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्याहस्ते झाले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून अनेक उपलब्ध असलेल्या व्यवसाय क्षेत्रातील विविध संधीं आणि नावाजलेल्या उद्योग संस्था तसेच उद्योजक या विषयावर केलेल्या विविध भित्तीपत्रिकेच्या माहितीचा वापर करावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. प्रा. व्ही. पी. पाटील यांनी स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. पूजा पारिशवाड यांनी प्रस्तावना केली. गायत्री मोरे हिने आभार मानले. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. रोड्रीक्स, प्रा. कल्पना जाधव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, मंगळवार, दि. ३ सप्टेंबर २०२४

## डीकेएएससीमध्ये संयुक्त कार्यक्रम

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व विवेक वार्षिक नियतकालिकेचे प्रकाशन असा संयुक्त कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. एस. मणेर होते. प्रसाद कुलकर्णी यांनी उद्घाटन केले. यावेळी डी. सी. कांबळे, डी. ए. यादव, सुनीता वेल्हाळ, सुभाष जाधव, आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, ४ सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाचा कलर्स अ‍ॅवॉर्ड जाहीर झालेल्यांचा सत्कार करताना डीकेएएससीचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# डीकेएएससीच्या तीन खेळाडूंना विद्यापीठाचा कलर्स अ‍ॅवॉर्ड

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंना २०२३-२४ चा शिवाजी विद्यापीठाचा कलर्स अ‍ॅवॉर्ड जाहीर झाला आहे.

प्रतिक मधुकर मगदुम (शरीरसौष्ठव), साहिल केसरकर व अभिजीत सासणे (कयाकिंग) या खेळाडूंनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शिवाजी विद्यापीठ संघाला कास्य व रौप्य पदक मिळवून दिली आहे. या घवघवीत यशाबद्दल तीनही खेळाडूंचे विद्यापीठामार्फत ब्लेझर (कोट), रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन कुलगुरु यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत कोल्हापूर, शनिवार, दि. २१ ऑगस्ट २०२४

# इचलकरंजीच्या कदम महाविद्यालयाने पटकावला महाकरंडक

## सांगलीत 'पीएनजी' एकांकिका स्पर्धा : इस्लामपूरच्या 'आरआयटी'च्या 'व्हाय नॉट' ला मिळाले उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : सांगलीत दोन दिवस चाललेल्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपदाचा पीएनजी महाकरंडक पटकावला. भावे नाट्यगृहात पार पडलेल्या स्पर्धेत राज्यभरातून संघांनी सहभाग घेतला.

कदम महाविद्यालयाच्या संघाने 'माई' एकांकिका सादर केली. कथा, अभिनय, प्रकाशयोजना, संगीत आदी सर्वच बाबतीत सरस ठरली. इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीची 'व्हाय नॉट' उपविजेती ठरली. पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'स्किम'ने तिसरा क्रमांक पटकाविला. कोल्हापुरातील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ



सांगलीतील एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांना मिलिंद गाडगीळ, राजीव गाडगीळ यांनी महाकरंडक प्रदान केला. यावेळी प्रा. भास्कर ताम्हनकर, श्रीनिवास जरंडीकर, अपर्णा गोसावी, अंजली भिडे आदी उपस्थित होते. (छाया : नंदकिशोर वाघमारे)

इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीच्या 'पिंडग्रान'ला चौथा क्रमांक मिळाला. अन्य पुरस्कार असे : दिग्दर्शन - महेश गवंडी (माई), श्रेयश, शिरीष (स्कीम), अभिषेक पवार (व्हाय नॉट?).

पार्श्वसंगीत - प्रसाद पोतदार (यात्रा, डीआरके, कोल्हापूर), साक्षी कांबळे (व्हाय नॉट?), मानसी, गणेश, वासुदेव (पडदा). प्रकाश योजना - आर्यन व्हनखेडे (उंच माझा झोका गं), अभिषेक स्वामी (यात्रा), निरंजन पाटील, विवेक जाधव (पिंडग्रान).

**सूचिता तारळेकर उत्कृष्ट अभिनेत्री**

अभिनयासाठी सूचिता तारळेकर (माई), पूर्वा कारेकर (उंच माझा झोका गं, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली), श्रावणी मारकड (पडदा, न्यू कॉलेज, कोल्हापूर) यांना पारितोषिके देण्यात आली. अभिनय (पुरुष) - समर्थ तपकिरे (पिंडग्रान), सौमित्र कागलकर, (व्हाय नॉट?), ऋतिक रास्ते (फिर्याद, टी. जे. कॉलेज पुणे).

नेपथ्य - सुमित शेलार (इंद्रायणी, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे), हर्षल कांबळे (पॉझिटिव्ह, कला, वाणिज्य महाविद्यालय, नागठाणे), करण परदेशी (बी अ मॅन, आप्पासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे).

विजेत्या संघांना गाडगीळ सराफ पेढीचे संचालक मिलिंद गाडगीळ, राजीव गाडगीळ यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली..

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
मंगळवार, १० सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डी.के.ए.एस.सी. कॉलेजच्या पुरस्कारप्राप्त खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या खेळाडूंना 'कलर्स अवॉर्ड' जाहीर

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या ३ खेळाडूंना सन २०२३-२४'चा शिवाजी विद्यापीठाचा कलर्स अँवार्ड जाहीर झाला आहे. प्रतिक मगदुम (शरीरसौष्ठव), साहिल केसरकर व अभिजीत सासणे (कयाकिंग) या खेळाडूंनी अखिल भारतीय अंतरविद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ठ कामगीरी करत शिवाजी विद्यापीठ संघाला कास्य व रौप्य पदक मिळवून दिली आहे. या धवधवीत यशाबद्दल तीनही खेळाडूंचे विद्यापीठामार्फत ब्लेझर (कोट), रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन कुलगुरु यांच्याहस्ते गौरविण्यात येणार आहे. या खेळाडूंचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार १२ सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर व मान्यवर.

# डीकेएएससीमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे मराठी विभागाच्यावतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि 'शब्दसाधना'- या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एकनाथ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने भित्तिपत्रिकेचे उद्घाटन झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवनचरित्र आणि त्यांनी लिहिलेल्या समृद्ध कविता, ओव्या, म्हणी या साहित्यावर मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी यंदाची भित्तीपत्रिका प्रदर्शित केली. डॉ. एकनाथ पाटील म्हणाले, मराठी साहित्याला शेकडो वर्षांची परंपरा आहे. विपुल साहित्य लेखनातून मराठी साहित्याचा परिघ विस्तारात गेला आहे. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील साहित्य वाचनाकडे थोडे गांभीर्याने लक्ष देऊन मराठी साहित्याची पताका आपल्या खांद्यावर घेऊन वाटचाल केले पाहिजे. महाविद्यालयातील भाषेचे वांग्मय मंडळ हे विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन कलागुणांना वाव देण्यासाठी महत्त्वाचे असतात.

प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकोबांच्या गाथेपासून संतपरंपरेतील सगळे अभंग, भारुडे इथं पासून ते आजपर्यंतच्या सगळ्याच कथा, कविता, नाटक, कादंबऱ्यांनी आपल्यासाठी साहित्याचे मोठे दालन उभे करून ठेवले आहे. शाळा न पाहिलेल्या बहिणाबाईसारख्या कवयित्रीने जगण्याचं तत्त्वज्ञान कवितेतून आपल्यासाठी रेखाटून ठेवले आहे. वाचनातून चांगले लेखक चांगले कवी तयार होतात. यासाठीच हे साहित्य आणि महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ असते.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष जाधव यांनी केले. आभार प्रा. रोहित शिंगे यांनी मानले. यावेळी ग्रंथपाल प्रा. विजय यादव, प्रा. भारती कोळेकर, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रीती भिसेश महेश शेख यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ शुक्रवार, १३ सप्टेंबर २०२४

## 'डीकेएएससी'मध्ये भित्तीपत्रिका स्पर्धा

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये कॉमर्स विभागांतर्गत 'व्यवसाय आणि व्यवसायाचे नमुने' या विषयावरील भित्तीपत्रिका स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत १०७ विद्यार्थी २४ गट करून सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी 'व्यवसाय आणि व्यवसायाचे नमुने' हा विषय भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून मांडला. कॉमर्स विभागप्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील यांनी स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. पूजा पारिशवाड आणि अमृता मांगलेकर यांनी प्रस्तावना केली. माझिरा मुजावर हिने सूत्रसंचालन केले. गायत्री मोरे हिने आभार मानले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१४ सप्टेंबर २०२४/९

# डीकेएएससीमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे मराठी विभागाच्यावतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि 'शब्दसाधना' या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. एकनाथ पाटील यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'शब्दसाधना' या भित्तिपत्रिकेचे उद्घाटन झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवनचरित्र आणि त्यांनी लिहिलेल्या समृद्ध कविता या साहित्यावर विद्यार्थ्यांनी यंदाची भित्तीपत्रिका प्रदर्शित केली. यावेळी बोलताना डॉ. एकनाथ पाटील म्हणाले, विपुल साहित्य लेखनातून मराठी साहित्याचा परिघ विस्तारात गेला आहे.



शब्द साधना भित्तिपत्रिकेचे उद्घाटन करताना डॉ. एकनाथ पाटील, डॉ. एस. एम. मणेर व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी.

विद्यार्थ्यांनी मराठी साहित्याची पताका आपल्या खांद्यावर घेऊन वाटचाल केले पाहिजे.

प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकोबांच्या गाथेपासून संत परंपरेतील अभंग, भारुडे इथपासून ते आज पर्यंतच्या सगळ्याच कथा, कविता, नाटक, कादंबऱ्यांनी आजच्यासाठी साहित्याचे दालन उभे करून ठेवले आहे. शाळा न पाहिलेल्या बहिणाबाईसारख्या कवयित्रीने जगण्याचं तत्त्वज्ञान कवितेतून रेखाटून ठेवले आहे.

प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव, आभार प्रा. रोहित शिंगे यांनी मानले. यावेळी ग्रंथपाल प्रा. विजय यादव, प्रा. भारती कोळेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रीती मिसे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, १६ सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. एकनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# 'डीकेएएससी'मध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी विभागातर्फे मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि ''शब्दसाधना'' या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एकनाथ पाटील यांची प्रमुख उपस्थिती, तर प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर अध्यक्षतस्थानी होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवनचरित्र आणि त्यांनी लिहिलेल्या समृद्ध कविता, ओव्या, म्हणी या साहित्यावर विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रिका प्रदर्शित केली. मराठी विभागप्रमुख प्रो. डॉ. सुभाष जाधव, प्रा. रोहित शिंगे, प्रा. भारती कोळेकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२१ सप्टेंबर २०२४/९

# पीएनजी एकांकिका स्पर्धेत इचलकरंजीची 'यात्रा' प्रथम

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगलीच्यावतीने आयोजित पी.एन.जी. महाकरंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेजची 'माई' एकांकिका प्रथम आली तर आर.आय.टी. कॉलेज,इस्लामपूरची 'व्हायनॉट' एकांकिका द्वितीय तर डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअर्स अँन्ड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर ची 'पिंडदान' एकांकिका तृतीय आली.



नाट्य परिषदेच्या सांगली शाखेच्यावतीने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन पीएनजी एकांकिका स्पर्धेतील विजेत्या संघाबरोबर राजीव गाडगीळ,मिलिंद गाडगीळ व इतर.

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या सांगली शाखेच्यावतीने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन पीएनजी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विजेत्या संघाला अनुक्रमे पंधरा हजार,दहा हजार, पाच हजार रुपये मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेत १७ संघ सहभागी झाले होते. तर नाट्य कलाकार, यासह सहकलाकारांसह २५०हून अधिक कलाकार सहभागी झाले होते. गेली दोन दिवस भावे नाट्य मंदिर कलाकारांनी भरले होते.

या स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिके पुढील प्रमाण-दिग्दर्शन- महेश गवंडी (माई), श्रेयस-शिरीश (स्किम), अभिषेक पवार(व्हाय नॉट), स्त्री अभिनय-सुचिता तारळेकर (माई), पर्वा कारेकर (उंच माझा झोका ग), श्रावणी मारकड (पडदा), पुरीष अभिनय- समर्थ तपकिरे (पिंडग्रान), सौमित्र कागलकर (व्हाय नॉट), ऋतिक रास्ते (फिर्याद), नेपथ्य-सुमित गवंडी (इंद्रायणी), हर्षल कांबळे (पॉझिटीव्ह), करण परदेशी (बी अ मॅन), पार्श्वसंगीत- प्रसाद पोतदार (यात्रा), साक्षी कांबळे (व्हाय नॉट),मानसी-गणेश-वासुदेव (पडदा), प्रकाश योजना-आर्यन व्हनखेडे (उंच माझा झोका ग), अभिषेक स्वामी (यात्रा), निरंजन पाटीलविवेक जाधव (यात्रा) यांनी मिळवली.

या स्पर्धेचा बक्षिस समारंभ पीएनजीचे संचालक राजीव गाडगीळ, मिलिंद गाडगीळ यांच्याहस्ते झाला. यावेळी नाट्य परिषद सांगली शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.भास्कर ताम्हणकर,श्रीनिवास जरंडीकर, कार्यवाह विशाल कुलकर्णी, अंजली भिडे, कुलदिप देवकुळे, शशांक लिमये, मकरंद कुलकर्णी, प्रशांत जगताप, मुकुंद पटवर्धन,चंद्रकांत धामणीकर, सनित कुलकर्णी, भालचंद्र चितळे, प्रशांत गोखले, अपर्णा गोसावी, सचिन पारेख आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

केसरी
२४ सप्टेंबर २०२४/५

# जयसिंगपूर कॉलेजमध्ये युवा महोत्सव उत्साहात

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर :** जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर येथे शिवाजी विद्यापीठाचा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४ हा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने संपन्न झाला. यानध्ये विद्यार्थिनीने १५ प्रकारच्या कला सादरीकरण केल्या.



जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर येथे ४४ व्या युवा महोत्सवात विद्यार्थिनीने सादर केलेले नृत्य.

युवा महोत्सवात कला प्रकारांचा निकाल; सुगम गायन- प्रथम- सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, द्वितीय-न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय-देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, उत्तेजनार्थ- चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज व भोगावती महाविद्यालय.

एकल लोकवाद्य वादन- प्रथम-दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, द्वितीय-न्यू कॉलेज, तृतीय- विवेकानंद कॉलेज, उत्तेजनार्थ- सर्व अधिविभाग, के.आय.टी चे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग. मराठी वक्तृत्व -प्रथम-यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, द्वितीय-जयसिंगपूर कॉलेज व तृतीय-शहाजी लॉ कॉलेज, उत्तेजनार्थ-राजाराम महाविद्यालय व विवेकानंद कॉलेज. हिंदी वक्तृत्व-प्रथम- न्यू कॉलेज, द्वितीय-दूधसागर महाविद्यालय, तृतीय-विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, उत्तेजनार्थ- डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग व श्री विजयसिंह यादव महाविद्यालय. इंग्रजी वक्तृत्व-प्रथम-शहाजी लॉ कॉलेज, द्वितीय-न्यू कॉलेज, तृतीय-केआयटी चे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, उत्तेजनार्थ- दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व जयसिंगपूर कॉलेज.

लोकनृत्य-प्रथम- जयसिंगपूर कॉलेज, द्वितीय- आजरा महाविद्यालय, तृतीय-विवेकानंद कॉलेज, उत्तेजनार्थ-सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज. लोककला- प्रथम-न्यू कॉलेज, द्वितीय-डॉ. घाळी कॉलेज, तृतीय-सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, उत्तेजनार्थ-डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग व भोगावती महाविद्यालय. एकांकिका-प्रथम-देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, द्वितीय-न्यू कॉलेज, तृतीय - दत्ताजीराव कदम कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय , उत्तेजनार्थ-विवेकानंद कॉलेज व आजरा महाविद्यालय. लघु नाटिका-प्रथम-जयसिंगपूर कॉलेज, द्वितीय-न्यू कॉलेज, तृतीय-राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, उत्तेजनार्थ-भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, मूकनाट्य-प्रथम-दूधसागर महाविद्यालय, द्वितीय-दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, तृतीय-भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, उत्तेजनार्थ- विवेकानंद कॉलेज व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज.

पथनाट्य- प्रथम-शहाजी लॉ कॉलेज, द्वितीय-राजाराम महाविद्यालय, तृतीय-दूधसागर महाविद्यालय, उत्तेजनार्थ- जयसिंगपूर कॉलेज व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज. भारतीय समूहगीत- प्रथम- विवेकानंद कॉलेज, द्वितीय-देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, तृतीय- सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, उत्तेजनार्थ- न्यू कॉलेज व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज. वादविवाद- प्रथम-डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, द्वितीय-सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, तृतीय-दूधसागर महाविद्यालय, उत्तेजनार्थ-न्यू कॉलेज व श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय. प्रश्नमंजुषा- प्रथम-के. आय. टी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, द्वितीय-विवेकानंद कॉलेज, तृतीय डी. डी. शिंदे सरकार कॉलेज-कोल्हापूर, उत्तेजनार्थ-न्यू कॉलेज व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग. एकपात्री अभिनय : निकाल प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता ता.२४ सप्टेंबर २०२४

# पीएनजी महाकरंडक स्पर्धेत माई एकांकिकेला विजेतपद

सांगली,ता.२३(प्रतिनिधी)-

अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगलीच्यावतीने आयोजित पी.एन.जी. महाकरंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत "इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेजची माई एकांकिका प्रथम आली तर आर. आय. टी. कॉलेज, इस्लामपूरची व्हाय नॉट एकांकिका व्दितीय तर डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअर्स अँन्ड टेक्नॉलॉजी, कोल्हापूरची पिंडदान एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला.

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या सांगली शाखेच्यावतीने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन पीएनजी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विजेत्या संघाला अनुक्रमे पंधरा हजार, दहा हजार, पाच हजार रुपये व मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेत १७ संघ सहभागी झाले होते.तर नाट्य कलाकार यासह सहकलाकारांसह २५० हून अधिक कलाकार सहभागी झाले होते. गेली दोन दिवस भावे नाट्य मंदिर कलाकारांनी भरले होते.



सांगली : विजेत्या संघांना बक्षीस वितरण प्रसंगी राजीव गाडगीळ,मिलिंद गाडगीळ, भास्कर ताम्हणकर, चंद्रकांत धामणीकर, श्रीनिवास जरंडीकर, चंद्रकांत देशपांडे यांच्यासह अन्य.

या स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिके पुढील प्रमाणे-दिग्दर्शन महेश गवंडी (माई), श्रेयस शिरीश (स्किम), अभिषेक पवार (व्हाय नॉट), स्त्री अभिनय-सुचिता तारळेकर (माई), पर्दा कारेकर (उंच माझा झोका ग), श्रावणी मारकड (पडदा), पुरीष अभिनय-समर्थ तपकिरे (पिंडग्रान), सौमित्र कागलकर (व्हाय नॉट), ऋतिक रास्ते (फिर्याद), नेपथ्य-सुमित गवंडी (इंद्रायणी), हर्षल कांबळे (पॉझिटीव्ह), करण परदेशी (बी अ मॅन), पार्श्वसंगीत-प्रसाद पोतदार (यात्रा), साक्षी कांबळे (व्हाय नॉट), मानसी-गणेश-वासुदेव (पडदा), प्रकाश योजना-आर्यन व्हनखेडे (उंच माझा झोका ग), अभिषेक स्वामी (यात्रा), निरंजन पाटील,विवेक जाधव (यात्रा) यांनी मिळवली.

या स्पर्धेचा बक्षिस समारंभ पीएनजीचे संचालक राजीव गाडगीळ, मिलिंद गाडगीळ यांच्याहस्ते झाला. यावेळी नाट्य परिषद सांगली शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.भास्कर ताम्हणकर, श्रीनिवास जरंडीकर,कार्यवाह विशाल कुलकर्णी, अंजली भिडे,कुलदिप देवकुळे, शशांक लिमये,मकरंद कुलकर्णी,प्रशांत जगताप, मुकुंद पटवर्धन, चंद्रकांत धामणीकर, सनित कुलकर्णी, भालचंद्र चितळे,प्रशांत गोखले, अपर्णा गोसावी, सचिन पारेख आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ | सोमवार, ३० सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यायाने स्वच्छता अभियान फेरी काढली.

# इचलकरंजी बसस्थानकात स्वच्छता अभियान

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यायाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने येथील शिवतीर्थ एसटी बसस्थानक परिसरात स्वच्छता अभियान राबविले. स्वयंसेवकांनी संपूर्ण स्वच्छता करून भागात स्वच्छता फेरी काढली. आगारप्रमुख सागर पाटील यांनी स्वागत केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अनिल जांभळे, वैशाली ढोबळे, आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ | सोमवार, ३० सप्टेंबर २०२४

# बटरफ्लाय वॉकमध्ये २२ फुलपाखरांची नोंद

## जांभळीतील ऑक्सिजन पार्कमध्ये आयोजन : 'डीकेएएससी'चे विद्यार्थी सहभागी

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २९ : जांभळी (ता. हातकणंगले) येथील ऑक्सिजन पार्कमध्ये आयोजित बटरफ्लाय वॉकला डीकेएएससी कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. फुलपाखरांचा अभ्यास आणि त्यांच्या विविधतेबद्दल माहिती मिळविण्यासाठी चाललेल्या तीन तासांच्या वॉकमध्ये २२ हून अधिक फुलपाखरांची नोंद करण्यात आली. यावेळी फुलपाखरू अभ्यासक व संवर्धक डॉ. संतोष उमराणे यांनी मार्गदर्शन केले.



जांभळी : येथील ऑक्सिजन पार्कमध्ये आयोजित बटरफ्लाय वॉकमध्ये डीकेएएससी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

डॉ. उमराणे यांनी फुलपाखरांच्या विविध प्रजाती, त्यांच्या जीवनक्रम, राहणीमान, आणि नैसर्गिक पर्यावरणाशी असलेली त्यांची घनिष्ठ नाती याविषयी माहिती दिली. वॉक दरम्यान विद्यार्थ्यांना फुलपाखरांचे निरीक्षण करण्याची आणि त्यांची छायाचित्रे काढण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी वॉकमध्ये मोठ्या उत्साहाने भाग घेतला. वॉकमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी फुलपाखरांचे निरीक्षण करताना विविध प्रजातींचे बारकाईने अध्ययन केले. विद्यार्थ्यांनी फुलपाखरांच्या रंगांची, त्यांच्यातील फरकांची आणि त्यांच्या हालचालींची माहिती मिळवली. यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजले.

बटरफ्लाय वॉकच्या या अनुभवाने ज्ञान वाढले आणि अभ्यासाला एक नवा दृष्टिकोन प्राप्त झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. आम्ही जांभळीकर फाऊंडेशनच्या प्रयत्नामुळे ऑक्सिजन पार्क हे पर्यावरणपूरक ठिकाण तयार झाले आहे.

येथे विविध वनस्पती आणि पक्ष्यांच्या प्रजातींसह फुलपाखरांची भरपूर विविधता आढळते. ऑक्सिजन पार्कने या परिसरातील जैवविविधता टिकविण्यास महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मत प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या मार्गदर्शनाखाली या वॉकचे नियोजन प्रा. ए. पी. सुतार, प्रा. एस. एस. शेख, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. व्ही. एम. पाटील आदींनी केले.

### वॉकमध्ये महत्त्वपूर्ण निरीक्षणे

- बटरफ्लाय वॉकदरम्यान लिंबूवर्गीय व काटेरी वनस्पतींचे फुलपाखरांच्या संवर्धनातील महत्त्व समोर आले आहे. या वनस्पतींवर फुलपाखरांच्या विविध प्रजातींनी अंडी घालणे, सुरवंटांची वाढ, फुलपाखरांची जीवनशैली याबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली. फुलपाखरांच्या विकासासाठी ऑक्सिजन पार्कवरील वातावरण अनुकूल असल्याचे दिसले. तसेच या वनस्पतींनी फुलपाखरांसाठी एक नैसर्गिक आश्रयस्थान म्हणून काम केल्याचे दिसले.

Scanned with CamScanner

सकाळ , सोमवार, ३० सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात महाराष्ट्रातील गडकोट किल्ले या भित्तीपत्रिकेचे अनावरण प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या उपस्थितीत झाले.

# 'डीकेएएससी' मध्ये भित्तीपत्रिका प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यायात इतिहास विभागातर्फे जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाराष्ट्रातील गडकोट किल्ले या भित्तीपत्रिकेचे प्रदर्शन भरवले. याचे अनावरण प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केले. पर्यटनामुळे नवीन संस्कृती शिकायची, साहसी कार्य करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. प्रभा पाटील, प्रो. डॉ. सुभाष जाधव, आदी उपस्थित होते. प्रास्तांविक विभागप्रमुख प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. आभार डॉ. अनिल जांभळे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार ३० सप्टेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये बिग बटरफ्लाय मंथ निमित्ताने बटरफ्लाय वॉकमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

# डीकेएएससीमध्ये बटरफ्लाय वॉक

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने बिग बटरफ्लाय मंथ निमिताने आयोजित व्याख्यान पार पडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. डॉ. संतोष उमराने यांनी फुलपाखरांविषयी माहिती देत असताना त्यांचा जीवनक्रम, आपती नैसर्गिक वारसा, परागीकरण, परिसंस्थेतील महत्त्व, पर्यावरणातील सौंदर्यमुल्य, निसर्ग पर्यटनातील आकर्षण आदी विषयी माहिती दिली. स्वागत, प्रास्ताविक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. ए. पी. सुतार, प्रा. एस.एस. शेख यांनी मानले. यावेळी डॉ. एन. एच. शेख, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते. बटरफ्लाय वॉकमध्ये विद्यार्थी, विभागातील प्राध्यापकांनी सहभाग नोंदवत जांभळी येथील ऑक्सीजन पार्कमध्ये विविध २० प्रजातीमधील फुलपाखरांची नोंद केली. या पार पडलेल्या दोन्ही कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता.

CS Scanned with CamScanner

सकाळ, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४

# 'डीकेएएससी'ला बॅडमिंटनमध्ये जेतेपद

इचलकरंजी, ता. ३० : महानगरपालिकेच्या जिल्हास्तरीय शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने विजेतेपद पटकावले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका यांच्यावतीने रिक्रेशन हॉलमध्ये स्पर्धा झाल्या. स्पर्धेत कॉलेजच्या १९ वर्षांखालील बॅडमिंटन (पुरुष) संघाने विजेतेपद पटकावले. संघात अपूर्व दवडते, वेदांत बुचडे, विश्वेश शिंदे, श्रेयस हाल्के या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत विजयावर शिक्कामोर्तब केला. सर्व खेळाडूंची सातारा येथे होणाऱ्या विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. अमित कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने विजेतेपद पटकावले.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा झाली.

# 'डीकेएएससी'मध्ये व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी पदवी व पदव्युत्तर विभागाच्या वतीने व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर दोन सत्रांत कार्यशाळा झाली. प्रमुख वक्त्या डॉ. प्रियांका कुंभार यांनी स्पर्धेच्या युगात आपणास टिकायचे असेल तर व्यक्तिमत्त्व प्रभावी असणे, ही काळाची गरज असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुभाष जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संजीवनी कांबळे हिने करून दिला.

आभार भारती कोळेकर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार १९ ऑक्टोबर २०२४



इचलकरंजी : विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या हर्षदा करंबेळकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगिवाले.

# डीकेएएससीच्या हर्षदा करंबेळकरची राज्यस्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी : विभागीय योगासन स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल सिंधुदुर्ग येथे झाल्या. या स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या हर्षदा संदीप करंबेळकर हिने योगासनाची प्रात्यक्षिके चपळाईने सादर केली. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेतील आर्टिस्टिक प्रकारात प्रथम क्रमांक व ट्रॅडिशनल खेळ प्रकारामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला. राज्यस्तरीय योगासन स्पर्धा २६ ते २८ ऑक्टोबर रोजी लातूर येथे होणार आहेत. या कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी तिचे अभिनंदन केले. तिला प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगिवाले, अमित कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले. सुहास पवळे यांचे प्रशिक्षण मिळाले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४



इचलकरंजी : तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झालेल्या लक्ष्मी पाटील हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, समवेत प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई.

# तायक्वांदोसाठी लक्ष्मी पाटीलची निवड

**प्रतिनिधी**

इचलकरंजी-

येथील डीकेएएससी कॉलेजची खेळाडू लक्ष्मी पाटील हिने जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत ६२ किलो वजनी गटात एकूण चार बाऊट जिंकून सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले. या खेळाडूची १२ ते १४ नोव्हेंबर दरम्यान अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तिचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तिला शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, २४ ऑक्टोबर २०२४

# तायक्वाँदो स्पर्धेसाठी लक्ष्मी पाटीलची निवड



लक्ष्मी पाटील

इचलकरंजी, ता. २३ : डी. के. ए. एस. सी. कॉलेजची खेळाडू लक्ष्मी पाटील हिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. तिने जीकेजी कन्या महाविद्यालय जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ६२ किलो वजनी गटात एकूण चार बाऊट जिंकून सुवर्णपदक पटकावले. तिची १२ ते १४ नोव्हेंबरला अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, १४ नोव्हेंबर २०२४



इचलकरंजी : स्पर्धेतील विजेत्या डीकेएएससी कॉलेजच्या संघासमवेत मार्गदर्शक.

# विभागीय हँडबॉल स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज तृतीय

इचलकरंजी, ता. १३ : पेठवडगाव (ता. हातकणंगले) येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत कोल्हापूर विभागीय हँडबॉल (पुरुष) स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने तृतीय क्रमांक पटकावला. संघाची शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संघातील आदित्य उकले, कल्पेश पोकार्डे, योगेश ओगले, सिद्धलिंग मांदिवली, अभिषेक मस्कर, पार्थ कांबळे, प्रणव कांबळे, प्रथमेश नराळ, वेदांत ढेरे, कौस्तुभ शेवाळे, प्रथमेश कोरवी, साजीद मुल्ला या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून तृतीय क्रमांकावर शिक्कामोर्तब केला. सर्व खेळाडूंचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंसोबत शिक्षक.

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचे राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत यश

इचलकरंजी, ता. १७ : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली.

१७ वर्षांखालील गटात स्वानंद कुंभोजेने थाळी फेकमध्ये सुवर्णपदक, १९ वर्षांखालील गटात विशाल सिंगने उंच उडी प्रकारात सुवर्ण, तर रेहान पटाईत याने उंच उडीमध्ये रौप्यपदक पटकावले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, अमित कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार २ डिसेंबर २०२४

# बॉक्सिंग स्पर्धेसाठी साक्षी जाधवची निवड



**इचलकरंजी :** सांगली येथे झालेल्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या साक्षी जाधवने गोल्ड मेडलचा पंच मारत यश संपादन केले. तिने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिची अकोला येथील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगिवाले, अमित कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार १९ डिसेंबर २०२४



इचलकरंजी : आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या रामानूज सिंग, प्रेमदास शिरोटे सुवर्ण पदकाची कमाई केली. खेळाडू समवेत प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, मार्गदर्शक.

# शिवाजी विद्यापीठ बॉक्सिंग संघात डीकेएएससीच्या दोघांची निवड

इचलकरंजी : कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष स्पर्धेत डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या दोन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण पदकाची कमाई केली. यामध्ये रामानूज सिंग याने ९२ किलो, प्रेमदास शिरोटे याने ६० किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. या खेळाडूंची २६ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान भटिन्डा (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सिंग पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन केले. प्रा. चेतन पाटील, प्रा. मयूर बोरगे यांनीही पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२० डिसेंबर २०२४/४

## डीकेएएससीच्या दोघांची बॉक्सिंग संघात निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२४ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष स्पर्धेत डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या दोन खेळाडूंनी उत्कृष्ठ कामगिरी करत सुवर्ण पदकाची कमाई केली.

यामध्ये रामानूज सिंग याने ९२ किलो वजनी गटात, तर प्रेमदास शिरोटे याने ६० किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. या खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सिंग पुरुष स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंचे प्राचार्य डॉ. एस. एस. मणेर यांनी अभिनंदन केले. प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
शनिवार २८ डिसेंबर २०२४

# इचलकरंजीत 'सहकाराद्वारे युवा उद्योजकता सक्षमीकरण' कार्यशाळा

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजच्या कॉमर्स विभागात 'सहकाराद्वारे युवा उद्योजकता सक्षमीकरण' यावर कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सन्मती बँकेचे चेअरमन सुनिल पाटील यांच्या हस्ते झाले. त्यांनी सहकार चळवळीच्या योगदानाचा उल्लेख करत सहकाराने इचलकरंजी आणि हातकणंगले तालुक्यातील वस्त्रोद्योग विकसित केल्याचे सांगितले.




इचलकरंजी : प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, कार्यशाळेचे उद्घाटक सुनिल पाटील यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. जुगळे, डॉ. मुरुडकर, डॉ. निलोफर शेख, व्ही. पी. पाटील, प्रा. पी. सी. पारिशवाड, डॉ. आर. एस. रॉड्रीक्स.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. वसंतराव जुगळे (माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ) यांनी सहकार कधीच फसत नाही, सहकारी अपयशी ठरतात, असे सांगत सहकारी या संकल्पनेचे महत्त्व विषद केले. डॉ. मच्छिंद्रनाथ मुरुडकर (सह. निबंधक, शिवाजी विद्यापीठ) यांनी सहकारात व्यावसायिक व्यवस्थापनाची आवश्यकता अधोरेखित करत शासन योजनांचा लाभ कसा घेता येईल, हे स्पष्ट केले.

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सहकाराच्या प्रभावीतेवर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. आदिती ढोकरे यांनी केले. समन्वयक प्रा. पी. सी. पारिशवाड यांनी आभार मानले. कार्यशाळेला प्राध्यापक, विद्यार्थी, मान्यवरांची उपस्थिती होती.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, ३० डिसेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये कार्यशाळेचे उद्घाटक सुनील पाटील यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये कॉमर्स विभागांतर्गत 'सहकाराद्वारे युवा उद्योजकता सक्षमीकरण' या विषयावर अग्रणी कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन सन्मती सहकारी बँकचे अध्यक्ष सुनील पाटील यांच्या हस्ते झाले. इचलकरंजी आणि हातकणंगले तालुक्यातील वस्त्रोद्योग सहकारामुळेच विकसित झालेला त्यांनी अनुभवातून विद्यार्थ्यांसमोर मांडला. मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाचे अर्थशात्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. वसंतराव जुगळे यांनी 'सहकार्य कधीच अपयशी ठरत नाही, सहकारी अपयशी होतात.' असे सांगून सहउद्योजक या संकल्पनेचे महत्त्व आणि गांभीर्य विद्यार्थ्यांना समजावले. सहनिबंधक डॉ. मच्छिंद्रनाथ मुरुडकर यांनी सहकार यशस्वी करण्यासाठी व्यावसायिक व्यवस्थापनची आवश्यकता मांडली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील, अग्रणी समन्वयक प्रा. डॉ. निलोफर शेख, प्रा. पी. सी. पारिशवाड, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. आदिनी ढोकरे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, ३० डिसेंबर २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या दोन खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ बॉक्सिंग संघात निवड झाली. सोबत मार्गदर्शक शिक्षक.

## 'डीकेएएससी'च्या दोघांची बॉक्सिंग संघात निवड

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या दोन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगीरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. रामानुज सिंग याने ९२ किलो वजनी गटात, तर प्रेमदास शिरोटे याने ६० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. दोघांचीही पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. दोघांचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. चेतन पाटील, प्रा. मयूर बोरगे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner